# स्त्री अभ्यास केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. ए. भाग एक (स्त्री अभ्यासक्रम) प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्याची तात्पुरती गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर होणार आहे. त्याव हरकती नोंदविण्याची मुदत शुक्रवार (दि. २)पर्यंत आहे. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी शनिवारी (दि. ३) प्रसिद्ध होणार आहे. प्रवेशासाठीच्या जागांची घोषणा सोमवारी (दि. ५) होणार आहे. प्रत्यक्ष प्रवेशाची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# विद्यार्थी निवडणुकांसाठी २९ ला मतदान

## १९ पासून प्रक्रिया सुरू, आजपासून आचारसंहिता

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार महाविद्यालय, विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणुकीसाठी २९ ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे. याच दिवशी मतमोजणी होऊन विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी नेतृत्व ठरणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील २९३ महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागांसाठी विद्यार्थीप्रतिनिधींसह अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी व राखीव प्रवर्ग प्रतिनिधी या पाच गटासाठी होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेला सुरूवात झाली. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने मंगळवारी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक नियमावली व आचारसंहितेनुसार शांततेत निवडणूक पार पाडावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, 'निवडणुकीची सर्व माहिती ई मेलव्दारे २९४ महाविद्यालयये व अधिविभागांना देण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांचे विद्यार्थी उमेदवार किंवा मतदार राहतील. कोणत्याही अभ्यासक्रमाच्या डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. उमेदवाराचे वय २५ वर्षांपेक्षा कमी असावे, एखाद्या विद्यार्थ्यांचा विषय मागच्या वर्गात राहिला असेल तर तो उमेदवारीसाठी अपात्र ठरेल. पहिल्या टप्प्यात १९ ऑगस्ट रोजी प्राथमिक यादी तर २२ ऑगस्ट रोजी अंतिम मतदान यादी जाहीर होणार आहे. प्रत्येक कॉलेजमधून ४ प्रतिनिधी असे ११७६ प्रतिनिधी विद्यार्थी परिषदेवर येणार आहेत.'

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'निवडणुकीसंदर्भात जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांची मदत घेतली जाणार आहे.'

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, निवडणूक समितीचे अध्यक्ष डॉ. टी. एम. गुरव, निवडणूक अधिकारी डॉ. डी. एन. काशिद, सदस्य ए. बी. कोळेकर, एस. पी. कोंबडे, एनएसएसचे प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

### खर्चमर्यादा एक ते पाच हजार

विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या आचारसंहितेनुसार महाविद्यालय व अधिविभाग प्रतिनिधीच्या रिंगणात उतरणाऱ्या उमेदवारांसाठी एक हजार तर अध्यक्ष, सचिवपदासह अन्य पदांच्या उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा ५ हजारापर्यंत ठेवण्यात आली आहे. याबाबतचे विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.



- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद स्थापनेची घोषणा ३० ऑगस्ट
- क्रिडा, कला, सांस्कृतिक नामनिर्देशनासाठी कागदपत्रांचे सादरीकरण ३ सप्टेंबर
- क्रिडा, कला, सांस्कृतिक नामनिर्देशित विद्यार्थ्यांची नावे जाहीर १३ सप्टेंबर
- महाविद्यालय, अधिविभागांच्या कला, क्रिडा, एनएसएस नामनिर्देशित

### निवडणूक प्रक्रियेचा कार्यक्रम

- मतदारयादी तयार करणे १९ ऑगस्ट
- कच्ची मतदारयादी जाहीर २० ऑगस्ट
- यादीतील चुकांसंदर्भात तक्रार २१ ऑगस्ट
- अंतिम मतदारयादी २२ ऑगस्ट
- उमेदवारी अर्ज भरणे २४ ऑगस्ट
- छाननी करून पात्र उमेदवारांची यादी २४ ऑगस्ट
- उमेदवारी यादीसंदर्भात निवारण करून अंतिम यादी २६ ऑगस्ट
- निवडणूक व निकाल २९ ऑगस्ट

पुढारी

# महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळासाठी २९ ऑगस्टला मतदान

## कुलगुरू डॉ. शिंदे यांची माहिती; निवडणूक आचारसंहिता लागू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. पहिल्या टप्प्यात २९ ऑगस्ट रोजी महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळासाठी मतदान होईल. त्यानंतर मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील २९३ महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागासाठी नवीन विद्यापीठ कायद्यानुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. निवडणुकीसाठीचे आरक्षण यापूर्वीच जाहीर झाले आहे. त्यानंतर प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम विद्यापीठाने मंगळवारी जाहीर केला आहे. दोन टप्प्यांत निवडणुका होणार आहेत. पहिल्या टप्प्यात महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागासाठी निवडणूक होईल. त्यानंतर विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी निवडणूक पार पडेल.




निवडणुकीसंदर्भातील सर्व माहिती अपडेट ठेवण्यासाठी 'स्टुडंट कौन्सिल इलेक्शन' नावाने वेब पोर्टल सुरू केले आहे. महाविद्यालयात तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात येणार आहे. निवडणुकीशी संबंधित पत्रव्यवहार केवळ ई-मेलद्वारे केला जाणार आहे.

महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागाची १९ ऑगस्टपर्यंत मतदार यादी तयार होईल. २२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. २४ रोजी विविध पदांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया चालेल. त्याचदिवशी दुपारी चार वाजता अर्जांची छाननी होऊन अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. २६ रोजी अर्ज माघारीची प्रक्रिया चालेल. २९ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष मतदान होऊन त्याचदिवशी मतमोजणी पार पडेल. प्रत्येक महाविद्यालयातून चार प्रतिनिधी असे मिळून ११७६ प्रतिनिधी विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवर जाणार आहेत. त्याच दरम्यान २० ते २९ ऑगस्ट याकालावधीत एनसीसी, एनएसएस, क्रीडा व सांस्कृतिक विभागासाठीच्या नामनिर्देशित प्रतिनिधी निवडीची प्रक्रिया चालणार आहे. त्यानंतर निवडणुकीचा दुसरा टप्पा सुरू होईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. पी. एन. गुरव आदी उपस्थित होते.

### विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम...

विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठीची मतदार यादी ६ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होईल. ९ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. विविध पदांसाठी १३ सप्टेंबरला अर्ज भरण्याची प्रक्रिया होईल. त्याचदिवशी दुपारी अर्जांची छाननी होऊन अंतिम यादी जाहीर होईल. १६ रोजी अर्ज माघारीची प्रक्रिया होऊन अंतिम उमेदवार यादी तयार होईल. २१ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविली जाणार आहे. २८ सप्टेंबरला विद्यापीठ विद्यार्थी परिषदेची स्थापना होईल.

# विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम जाहीर

**▌कुलगुरू देवानंद शिंदे यांची माहिती ▌आचारसंहितेस प्रारंभ ▌दोन टप्प्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शासनाच्या विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व २९३ महाविद्यालये व विद्यापीठ विद्यार्थी परिषद स्थापन करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली. यासाठी मंगळवारपासून आचारसंहिता लागू करण्यात आली असून, दोन टप्प्यात ही निवडणूक होणार आहे.

पहिल्या टप्प्यात विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभाग अशा २९४ ठिकाणी एकाच वेळी मतदान होणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात विद्यापीठ विद्यार्थी संघ स्थापनेची प्रक्रिया राबवली जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी परीक्षा



संचालक जी. एस. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीने महाविद्यालयीन शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी ५ कार्यशाळा घेतल्या, तर महाविद्यालयीन, अधिविभागातील विद्यार्थ्यांसाठी १० कार्यशाळांचे नियोजन केले आहे. निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. डी. एन. काशीद, तर निवडणूक प्रक्रिया समिती अध्यक्ष म्हणून पी. एन. गुरव यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये उपकुलसचिव, संचालक राष्ट्रीय सेवा योजना, शिक्षण विधी अधिकारी यांचा समावेश आहे. ही निवडणूक प्रक्रिया ३१ जुलैपासून ३० सप्टेंबरपर्यंत पार पडणार आहे.

दरम्यान, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभाग अशा एकूण २९४ ठिकाणी एकाच दिवशी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामधून महाविद्यालयासाठी प्रत्येक मान्यताप्राप्त तुकडीमधून एक वर्ग प्रतिनिधी निवडला जाणार आहे. महाविद्यालयांमधील सर्व विद्यार्थ्यांमधून एक सभापती, एक सचिव, एक महिला प्रतिनिधी, एक राखीव प्रवर्गाचा प्रतिनिधी निवडण्यात येणार आहे, तर प्राचार्यांकडून क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना आणि छात्रसेना यामधून एक विद्यार्थी नेमण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यामध्ये सर्व निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींची माहिती विद्यापीठात संकलित करून विद्यापीठ विद्यार्थी संघ स्थापन करण्यात येणार आहे. यातून पसंती क्रमानुसार सभापती, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव प्रवर्ग प्रतिनिधी निवडला जाणार आहे.

### २९ ऑगस्टला मतदान

शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या विद्यार्थी परिषद निवडणुकांचा कार्यक्रम आज जाहीर झाला. ३१ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत या निवडणुका होणार आहेत. महाविद्यालयातील निवडणुकांसाठी २९ ऑगस्टला मतदान होणार आहे.

### आवश्यक पात्रता :

- महाविद्यालय, विद्यापीठ विभागात शैक्षणिक वर्षात नोंदणी केलेला पूर्णवेळ प्रवेश घेतलेला विद्यार्थी असावा
- उमेदवाराचा शैक्षणिक वर्षाचा एकही विषय शिल्लक राहिलेला नसावा किंवा एटीकेटी घेतलेला नसावा
- उमेदवाराची कमाल वयोमर्यादा २५ वर्षे पूर्ण एवढी असावी
- नामनिर्देशनपत्र दाखल करतावेळी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असावे

लोकमत

## शिवाजी विद्यापीठाकडून कार्यक्रम जाहीर : आचारसंहिता लागू; २१ सप्टेंबरला मतदान, २३ सप्टेंबरला मतमोजणी

# विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाविद्यालयांमध्ये तब्बल २५ वर्षांनंतर यंदा खुल्या पद्धतीने निवडणुका होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने मंगळवारी सायंकाळी या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. कार्यक्रम जाहीर केल्याने दोन टप्प्यांमध्ये होणाऱ्या या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभागांतील विद्यार्थी परिषदेसाठी दि.२९ ऑगस्टला, तर विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी दि. २१ सप्टेंबरला मतदान होणार आहे.

या निवडणुकीचा कार्यक्रम कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी जाहीर केला.

### निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे

| कार्यक्रम | महाविद्यालय, विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी परिषद | विद्यापीठ विद्यार्थी परिषद |
|---|---|---|
| मतदार यादीची प्रसिद्धी | २० ऑगस्ट | ६ सप्टेंबर |
| हरकती नोंदविण्याची मुदत | २१ ऑगस्ट | ९ सप्टेंबर |
| अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी | २२ ऑगस्ट | ९ सप्टेंबर |
| विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष, सचिव, महिला प्रतिनिधी, राखीव संवर्गातील प्रतिनिधीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत | २४ ऑगस्ट | १३ सप्टेंबर |
| अर्जांची छाननी आणि उमेदवारांच्या यादीची प्रसिद्धी | २४ ऑगस्ट | १३ सप्टेंबर |
| हरकती नोंदविण्याची आणि अर्ज माघारीची मुदत | २६ ऑगस्ट | १६ सप्टेंबर |
| मतदान आणि मतमोजणी | २९ ऑगस्ट | २१ सप्टेंबर, २३ मतमोजणी |

दि. ३१ जुलै ते ३० सप्टेंबरदरम्यान दोन टप्प्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकीची तयारी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाकडून सुरु आहे. डॉ. गुरव म्हणाले, महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यांच्यासाठी स्वतंत्रपणे मतदान होईल. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी २९३ महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागांतील एक असे प्रत्येकी चार प्रतिनिधी मतदान करणार आहेत. या निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून लागू झाली आहे. निवडणूकविषयक प्रत्येक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील विशेष पोर्टलवर उपलब्ध असणार आहे. या पत्रकार परिषदेस वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा मंडळाचे जी. एस. पळसे, निवडणूक निर्णय अधिकारी डी. एन. काशीद, डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. पी. एम. गुरव, एस. टी. कोंबडे, उपस्थित होते.

# विद्यार्थी परिषदेसाठी २९ ऑगस्टला मतदान

## आचारसंहिता लागू; ३१ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत होणार निवडणूक

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या विद्यार्थी परिषद निवडणुकांचा कार्यक्रम आज जाहीर झाला. ३१ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत निवडणुका होणार आहेत. महाविद्यालयातील निवडणुकांसाठी २९ ऑगस्टला मतदान होणार आहे. याची आचारसंहिता आजपासून लागू आहे. विद्यार्थी परिषद निवडणूक व त्यानंतर स्टुडंट कौन्सिल निवड अशा दोन टप्प्यांत निवडणुका होतील. विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या २९३ महाविद्यालयांमध्ये



निवडणुका होतील, अशी माहिती विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही पत्रकार परिषद झाली.

डॉ. गुरव म्हणाले, 'विद्यार्थी परिषद निवडणुकांमधील आरक्षण काल जाहीर केले. आजपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. प्रत्येक महाविद्यालयातून अध्यक्ष, सचिव, विद्यार्थिनी प्रतिनिधी, आरक्षण प्रगर्वातील प्रतिनिधी, कला, क्रीडा, एन.सी.सी. व एन.एस.एस. अशा आठ जणांची विद्यार्थी परिषद निवडली जाणार आहे. कला, क्रीडा, एन.सी.सी. व एन.एस.एस. प्रतिनिधींची निवड प्राचार्य करणार आहेत, तर बाकीचे प्रतिनिधी सर्व विद्यार्थी निवडतील. २९ ऑगस्टला मतदान होईल''

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एस. पाटील उपस्थित होते.

> **विद्यार्थी परिषद निवडणुकीसाठी जो कायदा करण्यात आला आहे, त्यानुसारच संपूर्ण प्रक्रिया पार पडेल. या निवडणुकांमुळे विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे लोकशाहीला खऱ्या अर्थाने बळकटी येईल.**
> **- डॉ. देवानंद शिंदे** (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

### निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे

| कार्यक्रम | तारीख |
|---|---|
| मतदार यादी जाहीर करणे | २२ ऑगस्ट |
| उमेदवारी अर्ज दाखल करणे | २४ ऑगस्ट |
| माघार घेणे व अंतिम यादी | २६ ऑगस्ट |
| मतदान, मतमोजणी, विजेते जाहीर करणे | २९ ऑगस्ट |
| विद्यार्थी परिषद जाहीर करणे | ३० ऑगस्ट |

### विद्यापीठ कौन्सिल निवडणूक

| कार्यक्रम | तारीख |
|---|---|
| कौन्सिलसाठी मतदार यादी जाहीर करणे | ६ सप्टेंबर |
| अंतिम मतदार यादी जाहीर करणे | ९ सप्टेंबर |
| कौन्सिलसाठी अर्ज करणे | १३ सप्टेंबर |
| माघार घेणे | १६ सप्टेंबर |
| कौन्सिलसाठी अंतिम उमेदवार यादी | १६ सप्टेंबर |
| निवडणूक | २१ सप्टेंबर |
| मतमोजणी | २३ सप्टेंबर |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2010
Times of India

# Model code for SUK student council polls comes into force

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has announced the schedule for the process of formation of different student councils — university department student council, college-level student council and student council — on Tuesday.

The college elections will be held for the first time after a gap of around 25 years. RV Gurav, director of student development (SUK), said, "With the announcement of the schedule on Tuesday, the code of conduct has come into effect and will remain until the process is finished on September 30."

He added, "The voters' list will be prepared by the principals of the respective colleges in Sangli, Satara, and Kolhapur districts. The preparation of the list for the University Department Students' Council and affiliated college students' council will be done on August 19, while the final list will be published on August 22."

Any student admitted in the respective academic institution by August 19 is eligible for the voting process.

On being asked about the expenditure limit of the candidates, Gurav said, "The maximum possible expenditure per candidate for the election of class representative is Rs1,000 and for elections of president, secretary, lady representative and representative of reserved category is Rs5,000."

He added, "No candidate will be allowed to carry out procession or rally in the college or on the campus."

Devanand Shinde, SUK vice-chancellor, said college elections will give much necessary push to democracy on the campus.

He added that many issues and questions can arise during this process, but considering the importance of the elections and the platform it offers to the students, they are hoping for a peaceful election.

According to a varsity circular, the nomination date for formation of university department students' council will end on August 24. The last date to receive nomination for college level students' council will also end on August 24. However, for university level students' council, the last date to file nomination is September 13.

"The candidate should be enrolled in a full-time course and should have a good academic record. His/her social and cultural activity too will be considered while considering for the post," added a varsity official.